मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे "प्रा.बाळ आपटे सेंटर फॉर स्टडिज इन स्टूडंटस ॲन्ड युथ मुव्हमेंट" या केंद्रासाठी पदे निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २३९/१९/विशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०६ ऑगस्ट, २०१९

वाचा :-

१. राज्य मंत्रीमंडळाच्या दि.२०.०२.२०१९ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीचे इतिवृत्त.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.अध्यासन-२०१९/प्र.क्र.०८/विशि-२, दि.२४ मे, २०१९.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.अध्यासन-२०१९/प्र.क्र.०८/विशि-२, दि.३१ मे, २०१९.

प्रस्तावना :-

प्रा.बाळ आपटे यांचा विद्यार्थी चळवळीत महत्त्वाचा वाटा आहे. प्रा.बाळ आपटे हे एक समर्पित नेतृत्व होते. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना घडविले. तसेच युवकांमधील नेतृत्व गुण विकसित केले असून प्रसिध्दीपासून दूर राहून ते काम करीत राहिले .प्रत्येक काम जबाबदारी निष्ठेने मेहनतीने करत राहिले. आजच्या युवकांना राष्ट्रीय युवाशक्तीसाठी प्रेरीत होणे आवश्यक आहे. प्रा.बाळ आपटे यांचा विद्यार्थी चळवळीतील योगदानाचा अभ्यास, संशोधन करण्याकरीता त्यांचे नावे दालन सुरु केल्यास विद्यार्थ्यांना विद्यार्थी चळवळीचा इतिहास समजण्यास मदत होणार आहे.

सामाजिक परिवर्तनाच्या रचनात्मक च आंदोलनात्मक बाबींमध्ये विद्यार्थी व युवक चळवळीचे मोठे योगदान राहिले आहे. याबाबतचे कायमस्वरूपी अभ्यासकेंद्र निर्माण होणे अत्यंत गरजेचे ठरले आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून नवीन पिढी ही राजकीय, सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या एका आंदोलनातून होणाऱ्या बदलाबाबत प्रभावी ठरू शकेल अशा प्रकारच्या केंद्राची आवश्यकता आहे. याबाबतचा अभ्यासक्रम विदेशातल्या अनेक विद्यापीठांमध्ये यशस्वीरित्या चालू आहे तसा अभ्यासक्रम राज्यातील किमान एका विद्यापीठातून चालावा व तो मुंबई विद्यापीठातून व्हावा असा मानस होता. त्यादृष्टीने यासंदर्भात मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे प्रा.बाळ आपटे सेंटर फॉर स्टडिज इन स्टूडंटस ॲन्ड युथ मुव्हमेंट हे केंद्र सुरु करण्याबाबत दि.०४ डिसेंबर, २०१७ रोजी मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ठरल्याप्रमाणे मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे प्रा.बाळ आपटे यांचे नावाने केंद्र सुरु करण्याबाबत विद्यापीठाने दि.११ डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या विव्दत परिषदेमध्ये आणि व्यवस्थापन परिषदेमध्ये मान्यता दिली आहे.

मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे प्रा.बाळ आपटे सेंटर फॉर स्टडिज इन स्टूडंटस ॲन्ड युथ मुव्हमेंट हे केंद्र स्थापन करून सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यासाठी, तसेच त्यासाठी आवश्यक

असलेला निधी, पदे उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने यासंदर्भातील मंत्रीमंडळ प्रस्ताव दि.२०.०२.२०१९ रोजी पार पडलेल्या मंत्रीमंडळ बैठकीत ठेवण्यात आला. सदरहू बैठकीमध्ये मंत्रीमंडळाने हे केंद्र स्थापन करण्यास मान्यता व त्यासाठी आवश्यक असलेला निधी, पदे मंजूर करण्यास मंजूरी दिली व सदरचे केंद्र कार्यान्वीत करण्यासाठी मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. मंत्रीमंडळाने दि.२०.०२.२०१९ च्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सदरहू केंद्र कार्यान्वीत करण्याच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. सदरहू समितीच्या आढावा बैठकीत मा. मंत्री महोदयाच्या निदेशानुसार सदरचे केंद्र कार्यान्वीत करण्याबाबत संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

राज्य मंत्रीमंडळाने दि.२०.०२.२०१९ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मुंबई विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे प्रा.बाळ आपटे सेंटर फॉर स्टडिज इन स्टूडंटस ॲन्ड युथ मुव्हमेंट हे केंद्र कार्यान्वीत झालेले आहे. तसेच सदरहू केंद्रासाठी आवश्यक असलेली पदे निर्माण करण्यास मंजूरी दिल्यानुसार पदनिर्मिती करण्याबाबत शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

राज्य मंत्रीमंडळाने दि.२०.०२.२०१९ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे " प्रा.बाळ आपटे सेंटर फॉर स्टडिज इन स्टुडंट्स ॲन्ड युथ मुव्हमेंट" या केंद्रासाठी खालीलप्रमाणे पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	**पदनाम**	**पदसंख्या**	**वेतनश्रेणी**
१	प्राध्यापक	०१	रू.३७४००-६७००० व एजीपी रू.१००००
२	सहाय्यक प्राध्यापक	०१	रू.१५६००-३९१०० व एजीपी रू.६०००
३	संशोधक सहाय्यक	०२	रू.९३००-३४८०० व ग्रेड पे रू.४३००
४	ग्रंथपाल	०१	रू.१५६००-३९१०० व एजीपी रू.६०००
५	सहा:ग्रंथपाल/ग्रंथपाल सहाय्यक	०१	रू.५२००-२०२०० व ग्रेड पे रू.२८००
६	ग्रंथपाल परिचर	०१	रू.५२००-२०२०० व ग्रेड पे रू.१९००
७	मुख्य लिपिक	०१	रू.९३००-३४८०० व ग्रेड पे रू.४२००
८	लघूटंकलेखक	०१	रू.५२००-२०२०० व ग्रेड पे रू.२४००
९	लेखापाल/सहाय्यक लेखापाल	०१	रू.९३००-३४८०० व ग्रेड पे रू.४३००
१०	शिपाई	०१	रू.४४४०-७४४० व ग्रेड पे रू.१३००
	एकूण	**११**	

२. वर नमूद पदांसाठी येणाऱ्या वार्षिक रू.५८,७८,८००/- (अक्षरी रूपये अठ्ठावण लक्ष अठ्ठ्याहत्तर हजार आठशे फक्त) एवढ्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदरहू खर्च मुंबई विद्यापीठातील कर्मचाऱ्याचे वेतन ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतो त्यामधून भागविण्यात यावा.

३.	हा शासन निर्णय मंत्रीमंडळाने दि.२०.०२.२०१९ रोजी पार पडलेल्या मंत्रीमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८०६१६५४१७२९०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Eknath Sable

Digitally signed by Vijay Eknath Sable
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ad74dd20b49c8ab0bc83f54f3d9c91571a6cd47aeb9a9f05783d44cafe7a7d8e, serialNumber=ad8df0c87ab8e6c9f8574ab838dd4c466ebe81828f43e76bfa02129f8e862cd2, cn=Vijay Eknath Sable
Date: 2019.08.06 16:59:25 +05'30'

(विजय साबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई
४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई,
६. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई,
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई-१ महाराष्ट्र,
८. महालेखापाल (लेखा परीक्षा) मुंबई-१, महाराष्ट्र,
९. जिल्हा कोषागार अधिकारी मुंबई,
१०. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
११. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. कक्ष अधिकारी (विशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. निवड नस्ती (विशि-१)